**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २४ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये 5,000 नवीन पदव्युत्तर जागांच्या निर्मितीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.**
2. **राज्य शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी असून नागरिकांना सर्वोतोपरी मदत केली जाणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**
3. **प्रसिद्ध कानडी लेखक, ज्येष्ठ साहित्यिक एस एल भैरप्पा यांचं आज हृदयविकाराच्या धक्क्याने निधन.**
4. **येत्या पाच दिवसांत विदर्भात सर्वत्र मुसळधार पावसाची शक्यता; यवतमाळ, चंद्रपूर, आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी उद्या ऑरेंज अलर्ट.**

---------------------------------------------------------

मंत्रिमंडळ निर्णय बोनस/मेडिकल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज 10 लाख 91 हजार 146 रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी 78 दिवसांच्या वेतनाएवढा उत्पादकता-संबंधित बोनस मंजूर केला आहे. यासाठी 1865 पूर्णांक 68 कोटी रुपये खर्च येणार आहे. यंदाही दसऱ्याच्या आधी  पात्र रेल्वे कर्मचाऱ्यांना हा बोनस दिला जाणार आहे. प्रत्येक पात्र रेल्वे कर्मचाऱ्याला 78 दिवसांच्या वेतनाएवढी कमाल 17,951/- रुपये रक्कम बोनस म्हणून दिली जाईल. दरम्यान आज घेतलेल्या निर्णयांच्या व्याप्ती बद्दल अश्विनी वैष्णव यांनी माहिती दिली....

***(होल्ड बाइट- केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव 23 सेकंद)***

***करीब 95 हजार करोड रुपये के टोटल फैसले आज के कैबिनेट मीटिंग में हुए हैं। कई सेक्टर्स को कवर करते हैं यह फैसले, रेलवे हाईवे, रेलवे के बोनस का विषय है, शिप बिल्डिंग में मेजर रिफॉर्ममेंट, हमारे ह्यूमन रिसोर्स रिसर्च एंड डेवलपमेंट अक्टिविटीज के लिए रिसर्च अक्टिविटीज के लिए फैलोशिप का प्रोग्राम और मेडिकल एजुकेशन में नंबर सीड्स को बढ़ाना।***

केंद्रीय मंत्रिमंडळाने आज घेतलेल्या अन्य महत्वपूर्ण निर्णयात वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये 5,000 नवीन पदव्युत्तर जागांच्या निर्मितीला मंजुरी दिली

आहे. देशातील आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकारची सध्याची वैद्यकीय महाविद्यालये आणि पदव्युत्तर संस्थांची क्षमता वाढवण्यासाठी केंद्रीय पुरस्कृत योजनेच्या तिसऱ्या टप्प्याला मंजुरी देत पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी 5,000 जागांची वाढ तसंच एमबीबीएसच्या जागांमध्ये 5,023 जागांच्या वाढीस संमती दिली गेली. या योजनेअंतर्गत प्रत्येक जागेसाठी 1 पूर्णांक 50 कोटी रुपयांच्या वाढीव खर्चास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे देशातील वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांची क्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. तसेच, नवीन पदव्युत्तर जागांमुळे तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढण्यास मदत होईल आणि सरकारी वैद्यकीय संस्थांमध्ये विशेष अभ्यासक्रम सुरू करता येतील. यामुळे देशात एकूणच डॉक्टरांची उपलब्धता वाढेल.

**---------------------------------------------------------**

अतिवृष्टी फडणवीस /अजित पवार

सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत अतिवृष्टी आणि पुरामुळे प्रचंड नुकसान झालेलं दिसून येत आहे. शेती पिकांचं , जनावरांचं, घरांचं, व्यावसायिकांचं खूप मोठं नुकसान झालं असून पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, राज्य शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी असून नागरिकांना सर्वोतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. फडणवीस यांनी आज सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील निमगाव तसेच दारफळ सीना या गावाला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी केली आणि नागरिकांशी संवाद साधला.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***आपण सर्वांना मदत करणार आहोत, शेती करता वेगळी मदत करणार आहोत, घरांनकरता वेगळी मदत करणार आहोत, अन्नधान्यांची मदत वेगळी करणार आहोत आणि शेत साऱ्याचे जे काही नियम आहे ते सगळे नियम सगळ्यांना लावणार आहोत कारण एकप्रकारे जस टंचाई काळामध्ये पाऊस नसल्यामुळे परिस्थिती तयार होते तस अति पावसामुळे या ठिकाणी हि परिस्थिती तयार झालेली आहे.***

नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून दोन हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही पूरग्रस्तांना आवश्यक मदत देण्यासाठी शासन हात आखडता घेणार नाही, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने बाधित कोर्टी, मुंगशी, लांबोटी या भागांतील पूरग्रस्त परिस्थितीची पाहणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी

केली. पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांसाठी करमाळा इथं तात्पुरतं पुनर्वसन केंद्र उभारण्यात आलं असून पवार यांनी त्या ठिकाणी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली.

---

कृषिमंत्री भरणे

अहल्यानगर जिल्ह्यात आतापर्यंत ७ लाख ४९ हजार एकर शेती क्षेत्राचं अतिवृष्टीमुळे नुकसान झालं आहे. शेतीचे एक गुंठाही क्षेत्र पंचनाम्यापासून सुटणार नाही. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषांनुसार शासन शेतकऱ्यांना शासकीय मदत देण्यासाठी कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं. जिल्ह्याच्या शेवगाव तालुक्यातील भगूर आणि पाथर्डी तालुक्यातील करंजी या गावांतील अतिवृष्टीग्रस्त भागाची कृषीमंत्री भरणे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला.

---

मंत्री पंकज भोयर

वर्धा जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या पावसानं शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे सर्वे तातडीने पुर्ण करून शेतकऱ्यांच्या याद्या 27 सप्टेंबरपर्यंत पोर्टलवर अपलोड करून मदतीचे वितरण करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि मदत वाटपाचा पालकमंत्र्यांनी आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

---

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

कृषी क्षेत्राने इंधन आणि उर्जानिर्मितीकडे वळणं देशासाठी गरजेचं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. भारत जैव ऊर्जा आणि तंत्रज्ञानविषयक प्रदर्शनाच्या दुसऱ्या भागाचं उद्घाटन आज गडकरी यांच्या हस्ते नवी दिल्लीत झालं, त्यावेळी ते बोलत होते. देशातली ४५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे आणि त्यांचा जीडीपीतला वाटा १४ टक्के आहे. शेतमालाला वाजवी दर मिळत नसल्यानं ग्रामीण भागात गरीबी आणि बेरोजगारीची समस्या असल्याचं ते म्हणाले. शेतीतून उर्जानिर्मितीच्या प्रयत्नांना चालना दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

-----------------------------------------------------------

सेवापर्व-सेमीकंडक्टर

सेवा आणि सुशासन या सूत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्नरत आहे. सेवापर्व निमित्तच्या विशेष मालिकेच्या आजच्या भागात सरकार सेमीकंडक्टर मोहिमेच्या माध्यमातून करत असलेल्या उपाययोजनांविषयी जाणून घेऊ.

***(होल्ड बाईट)***

***(व्हॉइस कास्ट-नमता फलके १ मिनिट २० सेकंद)***

***सेमीकंडक्टर हे आधुनिक इलेक्ट्रॉनिक्सचा अत्यावश्यक भाग आहे. २०२१ मध्ये इंडिया सेमीकंडक्टर मिशनला प्रारंभ झाल्यापासून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारनं सेमिकंडक्टर क्षेत्रातील योजना प्रत्यक्षात उतरवण्यास सुरुवात केली. या महिन्यात नवी दिल्ली इथं सेमीकॉन इंडिया २०२५ ला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी सेमीकंडक्टर चिप्सचं वर्णन डिजिटल डायमंड्स असं केलं होतं.***

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी ०९ सेकंद)***

***फ्रेन्डस सेमीकंडक्टर की दुनिया में एक बात कही जाती है आयल वॉज, ब्लैक गोल्ड, बट चीप, आर डिजिटल डायमंड्स।***

***७६ हजार कोटी रुपयांच्या इंडिया सेमीकंडक्टर मिशन सेमीकॉन कार्यक्रमातून सेमीकॉन आणि डिस्प्ले मॅन्युफॅक्चरिंगसाठी ५०% पर्यंत अनुदान दिले जात आहे. डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्कीमच्या माध्यमातून २८० हून अधिक शैक्षणिक संस्था आणि ७० हून अधिक स्टार्टअप्सना यात सहभागी करून घेतले आहे. तर स्पेक्स योजनेतून इलेक्ट्रॉनिक घटक निर्मितीसाठी २५% अनुदान देण्यात येत आहे. देशाच्या सेमीकंडक्टर क्षेत्राने सेमिकॉन इंडिया २०२५ मध्ये एक महत्त्वाचा टप्पा गाठला. याठिकाणी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पंतप्रधान मोदींना मेड-इन-इंडिया चिप्सचा पहिला संच अधिकृतपणे सादर केला.***

-----------------------------------------------------------

जीएसटी

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. बांधकाम व्यवसायात देखील यामुळे सकारात्मक परिणाम होणार असून लोकांचे

घरकुलाचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे अशी भावना अकोल्याचे अभिषेक पाठक यांनी व्यक्त केली.

***(होल्ड बाईट-अभिषेक पाठक)***

***आज एसटी स्लॅप कमी करून सर्वसामान्यांना मोठा दिलासा दिलेला आहे. त्यामध्ये दुग्ध अन्न पदार्थापासून ते सिमेंट जेणेकरून जे आमच्या घरकुलाचे काम चालू आहे. सिमेंटवरील दर कमी झाल्याने तसेच मोदी आवास योजनेच्या मार्फत जे आम्हाला घरकुल मिळालेला आहे. त्यामुळे आमचे घर बांधण्याचे देखील स्वप्न पूर्ण होण्यात मदत होणार आहे.***

---

साहित्यिक एस.एल.भैरप्पा निधन

वंशवृक्ष, सार्थ, तंडा, काठ, धर्मश्री यांसारख्या प्रसिद्ध कादंबऱ्यांचे लेखक, कर्नाटकचे ज्येष्ठ साहित्यिक एस एल भैरप्पा यांचं आज हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित भैरप्पा यांना भारत सरकारने २०१६ मध्ये पदमश्री आणि २०२३ मध्ये पद्मभूषण पुरस्कार प्रदान केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनबाद्दल दुःख व्यक्त केलं आहे. भैरप्पा यांनी आपल्या लिखाणातून वाचकांची विवेक जागृती केली असं पंतप्रधान म्हणाले. तर भैरप्पा यांच्या निधनाने साहित्य विश्वात पोकळी निर्माण झाल्याची भावना कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामैय्या यांनी व्यक्त केली. एस एल भैरप्पा यांच्या साहित्याचा मराठीत मोठा वाचक वर्ग असून अंचू, आवेषण, आवरण आणि तंतू या त्यांच्या कादंबऱ्यांचा मराठीत अनुवाद झाला आहे.

---

हवामान

येत्या पाच दिवसांत विदर्भात सर्वत्र मुसळधार पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविली आहे. आजपासून २६ सप्टेंबर पर्यंत विदर्भातील काही ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहून मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांना उद्या ऑरेंज अलर्ट तर वर्धा नागपूर भंडारा या जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान येत्या काही तासात नागपूरमध्ये काही ठिकाणी मध्यम पाऊस तर चंद्रपूरमध्ये काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविली आहे.

---